# 1) सार्वजनिक धोरण (Public Policy)

Date: / /

## * प्रस्तावना :—

सार्वजनिक धोरण ही उपविद्याशाखा राज्यशास्त्र विद्याशाखेमधून अमेरिकेत उदयास आली. अमेरिकन पोलिटिकल सायन्स असोसिएशनने 1983 मध्ये राज्यशास्त्राच्या आठ उपविद्याशाखा सुचविल्या आहे. या आठपैकी एक उपविद्याशाखा 'सार्वजनिक धोरण' गठण घडण व आशय ही आहे डेव्हिड इस्टन यांनी राज्यशास्त्राच्या धोरण विश्लेषण हा आशय असावा, अशी भूमिका घेतली होती.

सार्वजनिक धोरण आखण्याचा अधिकार राजकारणाचा आहे एवढेच नव्हे तर सार्वजनिक धोरण आखण्याचे कार्यक्षेत्र राजकारणाचे स्वायत्त क्षेत्र आहे भारतात संसद, अमेरिकेत सिनेट, इंग्लंडमध्ये संसद यांना सार्वजनिक धोरण ठरविण्याचे अधिकार आहेत. सार्वजनिक धोरणाच्या मागण्यांचे सुसूत्रीकरण व आविष्कार हे राजकीय पक्ष, दबावगट, चळवळी यांच्यामार्फत होते यामुळे कायदेमंडळ व कार्यकारी मंडळ ही औपचारिक संस्थात्मक संरचना आणि राजकीय प्रक्रिया यांच्या प्रयत्नामधून सार्वजनिक धोरण स्वीकारले जाते याचा अर्थ सार्वजनिक धोरण निश्चितीवर पकड राजकारणाची आहे

सार्वजनिक धोरण ही राज्यशास्त्रातील सामाजिक शास्त्रातील उपविद्याशाखा आहे अर्थशास्त्र राज्यशास्त्र, कार्यक्रम मूल्यमापन, धोरण विश्लेषण आणि सार्वजनिक व्यवस्थापन इ. सामाजिक शास्त्रामध्ये सार्वजनिक धोरण या विद्याशाखेचे आधार

Date

मिळाला. परंतु राज्यशास्त्र व लोकप्रशासनच्या दोन विद्याशाखांमधून सार्वजनिक धोरण ही संकल्पना उदयास आली.

**सार्वजनिक धोरण :- व्याख्या**

* **थॉमस डाय**, " शासन ज्या गोष्टींची पर्यायांमधून निवड करते किंवा करत नाही, त्या म्हणजे सार्वजनिक धोरण होय."
* **रिचर्ड रोझ**, " सार्वजनिक धोरण म्हणजे निर्णय नाही, तर तो कृतीचा आकृतीबंध होय."
* "शासकीय घटकांचा त्याच्या पर्यावरणाशी असणारा संबंध म्हणजे सार्वजनिक धोरण होय."

* **सार्वजनिक धोरणाचे स्वरूप**

(1) सार्वजनिक धोरण हे ध्येयानुवर्ती असते जनतेच्या कल्याणासाठी विशिष्ट ध्येय, उद्दिष्टे साध्यासाठी शासन सार्वजनिक धोरण ठरविते आणि त्याची अमलबजावणी करते.

(2) शासनाच्या सामूहिक कृतीच्या परिपाक म्हणजे सार्वजनिक धोरण होय. तो शासकीय अधिकाऱ्यांचा कृतीचा आकृतीबंध होय. हा निर्णय वैयक्तिक नसुन ते सामुदायिक धोरण असते.

(3) सार्वजनिक धोरण म्हणजे शासन प्रत्यक्षात काय ठरविते किंवा काय कृती निवडते हे होय. विशिष्ट राजकीय वातावरणातील विशिष्ट प्रशासकीय व्यवस्थेशी शासकीय घटकांचा संबंध म्हणजे सार्वजनिक धोरण होय.

उदा., कायदा, वटहुकूम, न्यायालयीन निर्णय इ.

(4) सार्वजनिक धोरणात ज्या समस्येबाबत धोरण आखले जाते आहे, त्या समस्येबाबत शासकीय कृती अपेक्षित असते अशा अर्थाने सार्वजनिक धोरण हे सकारात्मक असते नकारात्मक अर्थाने एखाद्या विशिष्ट प्रश्नावरती शासनाने कोणती कृती करू नये हे ठरवणे.

(1) सार्वजनिक धोरण हा सरकारी निर्णय आहे. सार्वजनिक धोरण हे लक्ष्योन्मुख असते

(2) सार्वजनिक धोरण हे जनसामान्यांच्या हितासाठी सरकारच्या उद्देश पूर्तीसाठी आखले जाते.

(3) सार्वजनिक धोरण हे सरकारी साधनांद्वारे तसेच सरकारी अधिकाऱ्यांद्वारे विकसित केले जाते

(4) सार्वजनिक धोरण हे सरकारच्या सामूहिक कार्याचा परिणाम असतो

(5) सार्वजनिक धोरण हे सकारात्मक किंवा नकारात्मक असते

(6) सार्वजनिक धोरणामागे कायदेशीर संमती असते व त्यामुळे ते नागरिकांना बंधनकारक असते

* सार्वजनिक धोरणाची व्याप्ती :-

सार्वजनिक धोरण या उपविद्याशाखेची व्याप्ती अतिशय व्यापक आहे त्यामुळे सार्वजनिक धोरण या उपविद्याशाखेची निश्चित व्याप्ती विशद नाही. सार्वजनिक धोरण खासगी किंवा वैयक्तिक नसते, तर ते सरकारी किंवा शासकीय स्वरूपाचे असते त्यामुळे सार्वजनिक जीवनाच्या सर्व बाजू सार्वजनिक धोरणाशी संबंधित असतात.

लोककल्याण, लोकहीत, सार्वजनिक आरोग्य, धोरण निर्धारण, सार्वजनिक कायदा, सार्वजनिक वळणावळण यामुळे सार्वजनिक धोरणाची व्याप्ती वाढत जाते.

① सरकारने आखलेल्या सार्वजनिक धोरणाचे विश्लेषण करणे, त्या धोरणाचा परिणाम स्पष्ट करणे, धोरण आखणी प्रक्रिया, पर्यायी धोरण, धोरणाची अमलबजावणी व धोरणाचे मूल्यमापन ह सार्वजनिक धोरणाच्या व्याप्तीचा गाभा असतो. शहरी कृषि विषयक, आरोग्य विषयक, औद्योगिक, शैक्षणिक इ. सारख्या धोरणांमुळे केंद्रीकरण, विकेंद्रीकरण खासगीकरण, आधुनिकीकरण, समता, स्वातंत्र्य अशा संकल्पना व मूल्यव्यवस्थेत होणारे बदल हा सार्वजनिक धोरणाच्या अभ्यासाचा एक भाग ठरतो.

② सरकारने सार्वजनिक धोरण आखताना त्यावर कोणत्या सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय घटकांचा प्रभाव पडला हे अभ्यासले जाते घटनात्मक चौकट समता, वंश, धर्म, चळवळी इ.चा अभ्यास सार्वजनिक धोरणाच्या चौकटीत केला जातो

③ सार्वजनिक धोरण निश्चितीमुळे घडलेले राजकारण हा सार्वजनिक धोरणाच्या अभ्यासाच्या व्याप्तीचा एक महत्त्वाचा भाग ठरतो सत्तांतर झाल्यानंतर सार्वजनिक धोरणे बदलतात. यामागे सत्तेवर आलेल्या पक्षांना विशिष्ट समाज गटाचे संघटन करावयाचे असते त्यामुळे त्या गटाला मध्यवर्ती ठेवून धोरण निश्चिती केली जाते यामुळे राजकारण व धोरण यांची संबंध अभ्यास हा सार्वजनिक धोरण

Date : / /

या उपविदयाशाखेचा अभ्यास विषय करतो

(4) कायदे मंडळ, कार्यकारी मंडळ, न्यायमंडळ व विविध समित्या यांच्यामार्फत सार्वजनिक धोरण निश्चित होत जातात. नेव्हा सार्वजनिक धोरणाचा अभ्यास करताना दबावगट, संघटना व चळवळी यांच्या माध्यमातून सार्वजनिक धोरण आकार घेत जाते

* सार्वजनिक धोरणाचे ~~प्रकार~~ :— विकास

लोकप्रशासन ज्याची अमलबजावणी करते त्यास सार्वजनिक धोरण म्हटले जाते सरकारची धोरणे कशी तयार होतात त्याची अमलबजावणी कोणत्या प्रकारे होते याचा अभ्यास केला जातो

सार्वजनिक धोरण विश्लेषणाला चार हजार वर्षपूर्वीचा इतिहास आहे बॅबिलोन शहरापासून सार्वजनिक धोरणाच्या इतिहासाला सुरुवात होते वैचारिक आणि व्यवहारिक अशा दोन पाल ज्यांवर सार्वजनिक धोरण विश्लेषणाचे वर्गीकरण केले जाते

1960 नंतर मात्र प्रक्रियेपेक्षा सार्वजनिक धोरणाच्या आशयावर अधिक भर दिला पाहिजे अशी जाणिव आशयावर अधिक भर दिला पाहिजे अशी जाणिव राज्यशास्त्रज्ञांना झाली 1970 च्या दशकामध्ये अनेक लोकप्रशासन तज्ञ राज्यशास्त्रापासून याच्याचे अभ्यास क्षेत्र नव्याने वेगळ्या स्वरूपात उदयास आले 1980 च्या दशकामध्ये सार्वजनिक धोरण अभ्यासावर आधारीत नव्या अभ्यासक्रमाच्या संघटना, नियतकालिके, संस्था आणि विद्यापीठे पातळीवर पदव्यांचे शिक्षण देण्यास प्रारंभ झाला. आज राज्यशास्त्र व लोकप्रशासनामध्ये सार्वजनिक धोरण विश्लेषण हे मान्यता असलेले अभ्यास

Prabhat DAIRY

Date:

सेज नव्याने वेगळ्या स्वरुपात उदयास आले कुठी विल्सन यांच्या मते चांगले सार्वजनिक धोरण निर्माण होण्यासाठी चांगले मन असणे गरजेचे असते

राज्य व स्थानिक शासन संस्थांच्या कार्यक्रमाचे मूल्यमापन करण्यासाठीची प्रक्रिया 1970 मध्ये सुरु झाली. 1993 मध्ये सरकारची कामगिरी व निकाल संबंधी कायदा करण्यात आला व्यवस्थापन अंदाजपत्रक अशी विविध कार्यालये निर्माण करण्यात आली. मानुन संघराज्यांच्या रचनेमध्ये धोरण विश्लेषणाला एक सुरक्षित स्थान देण्यात आले आज अमेरिकेत धोरण विश्लेषणा एक सुरक्षित स्थान प्राप्त झाले

* सार्वजनिक धोरणाचे महत्व :—

सार्वजनिक धोरण या विद्याशाखेचे स्वरुप दिवसेंदिवस व्यापक होत चालले असून महत्व ही वाढले आहे विकसित राष्ट्रांना आपली प्रगती विकसित अवस्था टिकवून ठेवण्यासाठी आपल्या धोरणाच्या पाठपुरावा करणे बदलत्या परिस्थितील आपल्या धोरणात बदल करणे या गोष्टी कराव्या लागतात.

सार्वजनिक धोरणाचे महत्व पुढीलप्रमाणे :—

① सरकारच्या सार्वजनिक धोरण विश्लेषणास सुरुवात: सार्वजनिक धोरण अभ्यास विषयामुळे धोरण आखणी कशी केली जाते. धोरणाच्या अर्थ विविध सिध्दांत यांची शास्त्रीय माहिती अभ्यासकाला प्राप्त होते सामुळे सार्वजनिक धोरणाचे सरकारने आखलेल्या विश्लेषण करण्यास

विश्लेषणाची मदत करते सार्वजनिक धोरण हे लोकहिताचे आहे कि नाही हे ठरवता येते.

② धोरण विश्लेषण अभ्यासास उपयुक्त :-

संपूर्ण समाजासाठी अधिकारयुक्त मुल्यनिर्धारण करणे हे राजकीय व्यवस्थेचे सर्वात महत्वाचे कार्य असते समाजांतर्गत व समाजबाह्य या दोन प्रकारच्या पर्यावरणातुन सार्वजनिक धोरणाच्या मागण्या पुर्ण केल्या जातात. राज्यव्यवस्थेमध्ये मागण्यांचे रुपांतर धोरण निर्णयामध्ये होते

③ मुल्यव्यवस्थेतील बदल अभ्यासण्यास उपयुक्त :-

सरकारच्या धोरणामध्ये शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक, औद्योगिक, आरोग्यविषयक इ. धोरणांचा समावेश होतो या धोरणामध्ये न्याय, स्वातंत्र्य, समता, सामाजिक न्याय, केंद्रिकरण यासारख्या मुल्य व्यवस्थेत बदल घडून येतो

④ सामाजिक राजकीय पार्श्वभूमीचा परिणाम अभ्यासण्यास उपयुक्त :-

कोणत्याही देशाच्या सार्वजनिक धोरणावर तेथील सामाजिक परिस्थिती, राजकीय पार्श्वभूमी परिणाम करते सरकारचे सार्वजनिक धोरण घटनात्मक चौकटीत बसवावे लागते राष्ट्राच्या सामाजिक, सांस्कृतिक आर्थिक परिस्थितीचा विचार राष्ट्राच्या सार्वजनिक धोरणात केला जातो

⑤ सार्वजनिक धोरण व राजकारण यांचा संबंध स्पष्ट करा :-

सार्वजनिक धोरण व राजकारण यांचा आसेन जवळचा संबंध आहे. जे सरकार सत्तेत येते ते आधीच्या सरकारची धोरणे बदलून नव्या धोरणांची निर्मिती करते. जो समाज राजकीय

Date :

निवडून घेण्यास मदत करतो त्या समाजाला संतुष्ट संतुष्ट करण्यासाठी काही धोरणे आखली जाण्याची शक्यता असते एखादया धोरणाच्या समाजावर जर दुरगामी चांगला परिणाम होत असेल तर ती धोरणे नक्कीच ठेवली जातात.

⑥ संस्था, संघटना, दबावगट, सामाजिक चळवळी यांचा प्रभाव अभ्यासणे :—

सार्वजनिक धोरणे ही विविध मागण्या व निर्णयाची परिणीती असते या संघटना व चळवळी आपल्या मागण्या पूर्ण करण्यासाठी राजकीय स्तरावर दबाव टाकतात ज्या प्रश्नासाठी सामाजिक चळवळी निर्माण होतात त्या अप्रत्यक्षपणे सार्वजनिक धोरणावर प्रभाव टाकतात.

⑦ आंतर विद्याशाखीय अभ्यासास उपयुक्त :—

सार्वजनिक धोरण हे केवळ एका क्षेत्रापुरते मर्यादित नाही तर ते सर्व क्षेत्रिय आहे. सर्व शास्त्रामध्ये आंतरसंबंध जोडण्यासाठी सार्वजनिक धोरणाचा अभ्यास उपयुक्त ठरतो

* सार्वजनिक धोरणाचे मुल्यमापन

म्हणजे सार्वजनिक धोरणाचे मुल्यमापन होय. धोरण निर्मितीच्या प्रक्रियेतील शेवटची प्रक्रिया म्हणजे मुल्यमापन होय.

महत्व :—

सार्वजनिक धोरण मूल्यमापन

① सत्यता समजते
② प्रतिक्रिया मिळतात
③ फायदे-तोटे लक्षात येतात
④ सामाजिक स्थितीचा अभ्यास होतो
⑤ पुनर्बांधणी शक्य होते
⑥ धोरणात अपेक्षित बदल करता येतात.
⑦ प्रक्रियेचा सविस्तर अभ्यास शक्य.

① **सत्यता समजते :—** मूल्यमापनामुळे खऱ्या माहितीचे ज्ञान होते (त्याच्या) धोरणाच्या निर्मितीच्या आणि अमलबजावणीच्या मुख्य हेतु त्याच्या निर्मितीमागचे सत्य बाहेर पडते

② **प्रतिक्रिया मिळतात :—** मूल्यमापनाद्वारे लोकांच्या सा/विशिष्ट धोरणाबाबतच्या प्रतिक्रिया स्पष्ट होतात, कोणत्याही धोरणाच्या अमलबजावणी प्रक्रियेत जनतेची प्रतिक्रिया महत्त्वपूर्ण असते

③ **फायदे तोटे समजतात :-** धोरण जनकल्याणासाठी उपयुक्त ठरते का किंवा धोरण नव्या समस्यांना जोड फोडते या गोष्टी मूल्यांकनाद्वारे स्पष्ट होतात.

④ **सामाजिक स्थितीचा अभ्यास होतो :-** धोरणांमुळे समाजामध्ये लोकांच्या जीवनशैलीमध्ये काही गुणात्मक परिवर्तने

Prabhat DAIRY

झाली का, याची माहीती मुल्यांकनाद्वारे मिळते

⑤ पुर्नबांधणी शक्य होते :-

धोरणाच्या मुल्यमापनातुन त्या विशिष्ट धोरणाची पुर्नबांधणी शक्य होते

⑥ धोरणात अपेक्षित बदल :-

जर एखादे धोरण फायद्याचे ठरत असेल तर किंवा गुणात्मक ठरत नसेल तर मुल्यमापन करुन त्यात बदल करणे शक्य होत असते

⑦ प्रक्रियेचा सविस्तर अभ्यास :-

कोणत्याही धोरणाची निर्मीती, अमलबजावणी ही एक सातत्य असते ही प्रक्रिया पुर्णत्वास गेली आणि यशस्वी झाली किंवा अपयशी ठरली हे केवळ मुल्यमापनाद्वारे करु शकतो